सं.फौ.ख.क्र. ४८१/२०२३
सा.क्र. ०१
सरकार वि. गीताबाई
निशाणी ११ खाली.

**अभियोग पक्षातर्फे साक्षिदार क्रमांक ०१ चे शपथेवर बयान सुरु**

मी याव्दारे शपथेवर निवेदन करतो की,

| | |
|---|---|
| माझे नाव | :– रमेश पांडुरंग चहाकर, |
| माझे वय | :– ४६ वर्ष, |
| माझा व्यवसाय | :– शेती, |
| राहणार | :– बोराखेडी, ता. मोताळा, जि. बुलडाणा. |

**(सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता चव्हाण यांचे मार्फत)**

०१– मी आरोपीला ओळखतो. आज रोजी आरोपी ही न्यायालयात हजर नाही. आरोपीची हजेरी माफी मंजुर करण्यात आली आहे. आरोपी ही माझे गावातील आहे. राज्य उत्पादन शुल्कच्या कर्मचाऱ्यांनी मला पंच म्हणुन कुठेही बोलाविले नव्हते. राज्य उत्पादन शुल्कच्या कर्मचाऱ्यांनी माझे समक्ष आरोपीच्या ताब्यातुन काहीही जप्त केले नव्हते. राज्य उत्पादन शुल्कच्या कर्मचाऱ्यांनी माझे समक्ष घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा केला नाही. राज्य उत्पादन शुल्कच्या कर्मचाऱ्यांनी माझी सही एका कोऱ्या कागदावर बोराखेडी बसस्टॅंडवर घेतली होती. आता मला घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. परंतु, त्यातील मजकुर मला माहिती नाही.

**(साक्षीदार हा सरकारी पक्षाला साहय करत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी त्याला उलटतपासणीमध्ये विचारु शकणारे प्रश्न विचारण्याची तोंडी परवानगी मागीतली – परवानगी देण्यात आली.)**

०२– हे म्हणणे खरे नाही की, राज्य उत्पादन शुल्कच्या कर्मचाऱ्यांनी मला दि. १९/०५/२०२३ रोजी, ग्राम बोराखेडी येथे पंच म्हणून बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, तेथे आरोपी ही अवैधरित्या व विनापरवाना हातभटटी दारु विक्री करतांना मिळून आली होती. हे म्हणणे खरे नाही की, राज्य उत्पादन शुल्कच्या कर्मचाऱ्यांनी माझ्या समक्ष घटनास्थळावरून १२

लिटर क्षमतेच्या दोन टीन पिप्यामध्ये एकुण २४ लि. गरम उकळते मोहा रसायन, ०८ टीन डब्ब्यामध्ये प्रत्येकी १५ लि. मोहा फुल रसायन एकुण २०० लि. मोहा फुल रसायन साहित्यासह, एक स्टील हंडामध्ये ०४ लि. गावठी हा. भ. दारु व १५ लिटर क्षमतेच्या ०५ प्लॅस्टीक कॅनमध्ये एकुण ७५ लि. मोहा फुल रसायन व ०५ लिटर क्षमतेच्या प्लॅस्टीक कॅनमध्ये गा.हा. दारु असा मुददेमाल जप्त केला होता. हे म्हणणे खरे नाही की, राज्य उत्पादन शुल्कच्या कर्मचाऱ्यांनी सदर मुददेमाल जप्त करुन त्यातील १८० मिली दारु एका बॅाटलीत, दुसऱ्या बॅाटलीत १८० मि.ली. गरम मोहा रसायन नमुन्यायकरीता राखुन ठेवले होते. हे म्हणणे खरे नाही की, राज्य उत्पादन शुल्कच्या कर्मचाऱ्यांनी उर्वरित मुददेमाल जागीच नष्ट केला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबतचा जप्ती वजा घटनास्थळ पंचनामा राज्य उत्पादन शुल्कच्या कर्मचाऱ्यांनी माझे समक्ष तयार केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मला पंचनाम्यातील मजकुर वाचुन दाखविल्यानंतर मी त्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**(आरोपीतर्फे साक्षीदाराचा उलटतपास विधीज्ञ एम.के. शर्मा यांचे मार्फत)**

०३–  नाकारला.

**पुर्नःतपास काही नाही.**

दिनांक ११/०२/२०२६

सा.वा.दा.ब.अ.क.के.

स्वा.

(स.श्री. गायकवाड)
प्र.न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्रं.१
मोताळा, जिल्हा बुलडाणा.

श्रवणोत्तर स्विकृत,

स्वा.

(स.श्री. गायकवाड)
प्र.न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्रं.१
मोताळा, जिल्हा बुलडाणा.